# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.05.2024** **वारःशुक्रवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस
2. शक्तिप्रदर्शन करत विविध पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल
3. राज्यात तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी सर्वच पक्षांकडून जोरदार प्रचार आणि
4. राज्यात उन्हाची तीव्रता कायम; बुलडाणा जिल्ह्यात पारा 44 अंशांवर

**अर्ज-नाशिक, मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या अर्जाची छाननी होईल आणि येत्या सोमवार पर्यंत अर्ज मागे घेता येतील. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, आणि मुंबईतील सहा मतदारसंघांमध्ये 20 मे रोजी मतदान होणार आहे.

या टप्प्यासाठी विविध पक्षांच्या उमेदवारांनी काल शक्तिप्रदर्शन करत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार भारती पवार आणि नाशिकमधले शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार खासदार हेमंत गोडसे यांनी काल शक्तिप्रदर्शन करुन आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते छगन भुजबळ यावेळी उपस्थित होते.

नाशिकमधील दोन्ही जागा निवडून आणू असा विश्वास शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. नाशिकमधून नऊ तर दिंडोरी मधून सात उमेदवारी अर्ज काल दाखल करण्यात आले. भाजपाचे माजी खासदार हरीश्चंद्र चव्हाण यांनीही अर्ज दाखल केला आहे. कल्याण लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शक्तिप्रदर्शन करत काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काढलेल्या प्रचार फेरीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री रविंद्र चव्हाण, मनसेचे आमदार राजू पाटील आणि महायुतीतील मित्र पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदार संघाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांनी काल शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी पक्षाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे, माजी मंत्री आमदार अनिल परब, तसंच शिवसेना आणि महाविकास आघाडीचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार भूषण पाटील यांनीही काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रचार फेरी काढत शक्तिप्रदर्शन केलं.

पालघर लोकसभेसाठी महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान पालघर लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीकडून भाजपाचे डॉ. हेमंत सवरा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. ते आज आपला अर्ज दाखल करणार आहेत. मुंबई उत्तर मतदारसंघातून काल पाच उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पंकज देवरे यांनी दिली.

## प्रचार-कोल्हापूर, सांगली, लातूर

लोकसभा निवडणुकांच्या पुढील टप्प्यासाठी सर्व पक्षांच्या विविध मतदार संघात प्रचार सभा आणि बैठका सुरु आहेत. महायुतीला साथ देऊन सक्षम नेतृत्वाच्या हाती देश द्यावा असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल कोल्हापूरातील चंदगड मध्ये झालेल्या जाहीर सभेत केलं. कोल्हापूर मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. तर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नंदुरबार जिल्ह्यातील भाजपा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन केलं.

सांगली लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची तासगाव इथं काल जाहीर सभा झाली. देशाच्या सर्व घटकातील लोकांना एकत्र करून देशाच्या भविष्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणलं पाहिजे असं आवाहन पवार यांनी यावेळी केलं. शरद पवार यांनी काल कोल्हापुरात पत्रकार परिषदेत घेतली. इंडिया आघाडीत अद्याप पंतप्रधानपदाबाबत चर्चा झालेली नाही. पुरेसे संख्याबळ आल्यास निर्णय घेऊ असं पवार यांनी यावेळी स्पष्ट केलं.

शिवसेना-भाजपच्या लुटुपुटुच्या भांडणात आम्ही काय करावे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. ते काल लातूरमध्ये वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार नरसिंग उदगीरकर यांच्या प्रचारासाठी आल्यानंतर पत्रकारांशी बोलत होते. आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस तयार असेल तर एकत्र निवडणूक लढवू अशी इच्छाही यावेळी आंबेडकर यांनी बोलून दाखविली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातला भारत उभा करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत असं प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केलं. ते काल धाराशिव इथं महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित रिपाई कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. राहुल गांधींनी भारत जोडण्यापेक्षा काँग्रेस पक्ष जोडण्यासाठी प्रयत्न करावेत अशी टीकाही आठवले यांनी यावेळी केली.

## राहुल गांधी, पंतप्रधान-अहमदनगर

पुणे लोकसभा मतदारसंघाचे महविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची आज पुण्यात सभा होणार आहे. एस एस पी एम एस महाविद्यालय मैदानावर आज दुपारी होणाऱ्या या सभेला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात उपस्थित राहणार आहे.

महायुतीचे अहमदनगर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार सुजय विखे यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांची सभा येत्या 7 तारखेला अहमदनगरमध्ये सावेडी इथं होणार आहे. याच दिवशी मोदी नंदुरबारमध्ये डॉ हिना गावितांच्या प्रचारार्थ सभा घेणार आहेत.

**राजीनामे-नवीमुंबई**

महायुती कडून ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी नरेश म्हस्के यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्यानंतर भाजपा कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. नवी मुंबईतले भाजपाचे माजी नगरसेवक आणि पदाधिकारी अशा एकंदर 64 जणांनी आपले राजीनामे पक्षाचे माजी सभागृह नेते रविंद्र इथापे यांच्याकडे सादर केले. मीरा भाईंदर आणि ठाण्यामध्येही काही भाजपा कार्यकर्त्यांनी राजीनामे दिल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**गृहमतदान**

85 वर्षांपेक्षा जास्त वय असलेले मतदार आणि दिव्यांग मतदारांना घरून मतदान करण्याची सुविधा निवडणूक आयोगानं उपलब्ध करून दिली आहे. बारामती मतदारसंघात गृह मतदानाची ही प्रक्रिया सुरु झाली असून काल बारामती तालुक्यातल्या खुटवड गाव इथल्या 89 वर्षाच्या वयोवृद्ध महिला मतदारानं प्रथमच घरून मतदान केलं. रत्नागिरी शहरातल्या आरोग्य मंदिर परिसरातल्या 87 वर्षांच्या महिला मतदारांनीही घरून मतदान केलं आणि या सुविधेबद्दल आभार मानले. दरम्यान, गृहमतदान करताना गोपनीयता सहायक, निवडणूक निर्णय अधिकारी, तसंच तहसीलदार यांनी भेट देऊन पाहणी करावी, अशी सूचना रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी केली.

**मतदार सहाय्यता कक्ष**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीत मतदारांचे नाव आणि मतदान केंद्र शोधण्यासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात मतदार सहाय्यता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली. यासाठी प्रत्येक मतदारसंघ क्षेत्रात स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारांना माहितीसाठी त्यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधता येणार आहे.

**यात्रा-अहमदनगर**

राज्यात प्रसिद्ध असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातल्या पारनेर तालुक्यातील, निघोज इथल्या मळगंगा देवीच्या यात्रौत्सवाला कालपासून सुरुवात झाली. मळगंगा देवीची घागर मिरवणूक हा राज्यात एक अद्वितीय सोहळा गणला जातो. रात्रभर बगाड गाड्यांची मिरवणूक संपल्यानंतर रात्री इथं ऐतिहासिक बारवेतून घागर निघते. या यात्रेसाठी लाखो भाविकांनी हजेरी लावली आहे. जागतिक आश्चर्य असलेले रांजणखळगे इथे बघायला मिळतात.

**बायो-डिझेल साठा जप्त-बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर जवळ पोलीस अधीक्षकांच्या पथकानं सुमारे 800 लिटरचा अवैध बायो डिझेल साठा जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पोलिसांची कारवाई सुरू आहे.

**<u>पाणी पुरवठा बंद-नांदेड</u>**

नांदेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या विष्णुपुरी इथल्या पंप हाऊसमध्ये विद्युत मोटारीत तांत्रिक बिघाड झाल्यामुळे धरणातून होणारा पाणीपुरवठा ठप्प झाला असून आगामी चार दिवस नांदेड शहराला पाणीपुरवठा होणार नाही. त्यामुळे नांदेडकरांनी आहे त्याच पाण्याचा जपून वापर करावा, असं आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी केलं आहे.

**<u>हवामान-उष्णता-बुलडाणा</u>**

राज्याच्या विविध भागात उन्हाची तीव्रता कायम असून येत्या पाच दिवसांत महाराष्ट्रात उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. बुलडाणा जिल्ह्यात तापमानाचा पारा 44 अंशांवर गेला असून अनेक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट जाणवते आहे. अकोला, मालेगाव मध्येही काल 43 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक क्षेत्रात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी काळजी घ्यावी तसंच उष्माप्रतिबंधक उपाययोजना करव्यात अशी सूचना हवामान विभागानं केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**